राजपूत समाजासाठी वीर शिरोमणी महाराणा प्रताप आर्थिक विकास महामंडळ स्थापन करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२४/प्र.क्र.१५६/का.१४२५-अ**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ३२.
दिनांक : ०३ ऑक्टोबर, २०२४

**प्रस्तावना :-** राज्यातील जवळपास सर्वच जिल्ह्यात रहिवासी असलेल्या राजपूत समाजातील लोकांना आर्थिक पाठबळ मिळावे तसेच या समाजाची आर्थिक स्थिती उंचावण्यासाठी आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करण्याची मागणी आहे. राजपूत समाजातील घटक आर्थिकदृष्टया मागास आहेत. या समाजातील युवकांना उद्योग व्यवसायासाठी अर्थपुरवठा होवून बेरोजगारी कमी होवून समाजाचा आर्थिक स्तर सुधारणे आवश्यक आहे. यासाठी राजपूत समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी वीर शिरोमणी महाराणा प्रताप आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :-** राजपूत समाजामधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी शेतीपूरक व्यवसाय, विपणन, प्रक्रिया, उद्योग, पुरवठा आणि साठवणूक याच बरोबरीने लघु उद्योग, वाहतूक, अन्य व्यावसायिक उद्योग उपलब्ध करुन देणे किंवा त्यास अर्थसहाय्य करुन स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन आर्थिक स्तर उंचावणे, यासाठी दिनांक २३ सप्टेंबर,२०२४ च्या मंत्रीमंडळ बैठकीमध्ये वीर शिरोमणी महाराणा प्रताप आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय झाला आहे. त्यानुसार कंपनी अधिनियम,२०१३ च्या कलम- ८ अंतर्गत शासकीय हमी असलेली व भाग भांडवल नसलेली कंपनी म्हणून वीर शिरोमणी महाराणा प्रताप आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात येत आहे.

२. सदर प्रस्तावित महामंडळाच्या संचालक मंडळाची रचना खालीलप्रमाणे :

| अ.क्र. | पद | पदनाम |
|---|---|---|
| १ | अध्यक्ष | अध्यक्ष |
| २ | उपाध्यक्ष | उपाध्यक्ष |
| ३ | वित्त विभागाचे सचिव | सदस्य |
| ४ | कौशल्य विकास,उद्योजकता आणि नाविन्यता विभागाचे सचिव | सदस्य |
| ५ | नियोजन विभागाचे सचिव | सदस्य |
| ६ | उद्योग, उर्जा व कामगार विभागाचे सचिव (उद्योग) | सदस्य |
| ७ | कृषि व पदुम विभागाचे सचिव (कृषि) | सदस्य |
| ८ | इतर मागास व बहुजन कल्याण विभागाचे सचिव | सदस्य |
| ९ | महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक | सदस्य सचिव |
| १० | राष्ट्रीय मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाचा प्रतिनिधी | सदस्य |
| ११ | इतर ७ अशासकीय सदस्य | सदस्य |

व्यवस्थापकीय संचालक हे किमान मंत्रालयीन सहसचिव दर्जाचे असतील.

३. महामंडळाचे मुख्यालय छत्रपती संभाजीनगर येथे राहील.

४. महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल हे रु. ५० कोटी इतके राहील. दरवर्षी या महामंडळाच्या भागभांडवलासाठी निधीच्या उपलब्धतेनूसार तरतूद केली जाईल. तसेच सदर महामंडळाच्या कार्यालयासाठी जागा व आवश्यकतेनुसार असलेला कर्मचारीवृंद उपलब्ध करून देण्यात येईल.

५. महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर हा शासन निर्णय उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४१००३१७४१५७२९१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरी साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAJENDRA
PANDURANG WAGH

Digitally signed by RAJENDRA PANDURANG WAGH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARTMENT,
2.5.4.20=9e4468a63fe9f9f2a565a0790f46e3c14a3715b23704304338457
20a9c4c8107, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=7ADB1868A49B8719E27D3453044671A8CEDDBD04AF26
DD2089ED03E6B1BD92BD, cn=RAJENDRA PANDURANG WAGH
Date: 2024.10.08 16:36:26 +05'30'

**( राजेंद्र वाघ )**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
५. मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
६. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
७. सर्व सन्माननीय सदस्य, विधानपरिषद / विधानसभा
८. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
९. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई,
१०. मा. उप मुख्यमंत्री (गृह) विभाग यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
११. मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) विभाग यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
१२. मंत्रालयीन विभागाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई,
१३. सर्व मा. मंत्री महोदय यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१४. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद), विधानभवन, मुंबई,
१५. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा), विधानभवन, मुंबई,
१६. महासंचालक, माहिती जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
१७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर,
१८. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर,
१९. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग यांचे स्वीय सहायक,
२०. निवडनस्ती, कार्यासन १४२५-अ, नियोजन विभाग.